# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक ३१ मार्च, २०१६ / चैत्र ११, १९३८ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) महसूल, पूनर्वसन व मदत कार्य, भूकंप पुनर्वसन, अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ, कृषी आणि फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय, राज्य उत्पादन शुल्क मंत्री**<br>**(२) परिवहन मंत्री**<br>**(३) उर्जा, नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - १९**

---

### राज्यात विद्युत अपघातात वीज कर्मचारी व नागरीकांचे झालेले मृत्यू

**(१) * ४४२८० श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विद्युत अपघातात दरवर्षी सर्वसाधारणपणे साडेसात हजार वीज कर्मचारी आणि नागरीक मृत्यू पावतात अशी माहिती दिनांक १७ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दरवर्षी सर्वसाधारणपणे साडेसात हजार वीज कर्मचारी आणि नागरीकांचा मृत्यू होण्याची विवक्षित कारणे काय आहेत,

(४) असल्यास, मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या व नागरीकांच्या वारसदारांना शासनामार्फत आर्थिक मदत देण्याबाबत व विद्युत अपघात रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही. मुख्य विद्युत निरीक्षक यांच्या अहवालानुसार सन २०१४-१५ यावर्षात एकूण १००१ मानवी प्राणांतिक (वीज कर्मचारी व नागरीक) अपघात झालेले आहेत.

(२) यासंदर्भात महावितरण व मुख्य विद्युत निरीक्षक यांच्या मार्फत चौकशी करण्यात आली आहे.

(३) अनवधानाने प्रभारीत वाहिनीच्या संपर्कात येणे, अनधिकृत काम/वापर, सुरक्षिततेकडे दुर्लक्ष/ सुरक्षिततेचा अभाव, देखभालीचा अभाव, वीज प्रवाह उतरल्यामुळे, फ्लॅशओवर, सदोष उपकरणे/ अवजारे/ हत्यारे, यांत्रिक इतर कारणामुळे अपघात इ. विद्युत अपघाताची कारणे आहेत.

(४) प्राणांतिक विद्युत अपघात झालेल्या कर्मचारी/नागरीक यांच्या वारसदारांना व अप्राणांतिक विद्युत अपघात झालेल्या कर्मचारी/ नागरीकांना महावितरणच्या नियमानुसार त्वरित आर्थिक मदत दिली जाते. तसेच विद्युत अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी महावितरणतर्फे विविध उपाययोजना सतत करण्यात येत असतात. जानेवारी,२०१६ मध्ये दिनांक ११.१.२०१६ ते १७.१.२०१६ हा सप्ताह विद्युत सुरक्षा सप्ताह म्हणून आयोजित करुन महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेमध्ये विद्युत सुरक्षाविषयक जनजागृती करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील महावितरण कंपनीने कंत्राटी कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीच्या रकमेचा केलेला गैरव्यवहार

**(२) * ५१६४६ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील महावितरण कंपनीमधील कंत्राटी कामगारांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम त्यांच्या वेतनातून कपात करुनही, महावितरण कंपनीने ती न भरता स्वत:कडे ठेवून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याचे दिनांक १२ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात मुख्य कार्यकारी संचालक व भविष्य निर्वाह निधी मुख्य प्रबंधक यांचेकडे लेखी निवेदन देऊनही अद्याप कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कंत्राटी कामगारांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम भरण्याबाबत व गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही. तथापि कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात होणाऱ्या भविष्य निर्वाह निधीच्या रकमेचा गैरव्यवहार झाल्याबाबत दि. १४ व १५ फेब्रुवारी, २०१६ च्या स्थानिक दैनिक वर्तमानपत्रात बातम्या प्रसिध्द झाल्या होत्या.

(२), (३) व (४) आयुक्त, क्षेत्रिय भविष्य निर्वाह निधी, उप प्रादेशिक कार्यालय, कोल्हापूर यांच्यामार्फत चौकशी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे खंडाळा (ता.नरखेड, जि.नागपुर) येथे मे. मिडलॅण्ड स्टोन यांनी अवैधरित्या गौण खनिजाचे उत्खनन केल्याबाबत

**(३) * ४४८९२ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे खंडाळा (ता.नरखेड, जि.नागपुर) येथील सर्व्हे नं. ५५/१ व १३० मध्ये मे. मिडलॅण्ड स्टोन यांनी अवैधरित्या गौण खनिजाचे उत्खनन केल्यामुळे, स्थानिक नागरीकांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार, नरखेड यांनी दिनांक ७ जानेवारी, २०१५ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार ७ कोटी ६४ लाख ६६ हजार इतकी दंडाची रक्कम शासनाकडे जमा करण्याचे आदेश दिल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पारित केलेल्या आदेशास उपविभागीय अधिकारी, काटोल यांनी तहसिलदारांच्या आदेशाची व केलेल्या पंचनाम्याची शहानिशा न करता स्थगिती आदेश दिल्याने शासनाचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने ठेकेदाराकडून रॉयल्टी वसूल करण्याबाबत तसेच उपविभागीय अधिकारी, काटोल यांच्याविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) मौजे खंडाळा (बुज) ता. नरखेड येथील सर्वे नं. ५५/१ व १३० मधील खाणपट्टाधारक मंजूर क्षेत्राबाहेर व जास्त खोल उत्खनन करीत असल्याची तक्रार तहसिलदार नरखेड यांना प्राप्त झाली होती. सदर तक्रारीनुसार तहसिलदार नरखेड यांनी सदर खाणपट्टयातील उत्खननाचे मोजमाप केले असता, खाणपट्टाधारकाने शासन जमा केलेल्या स्वामित्वधनाच्या रकमेपेक्षा जास्त उत्खनन केल्याचे आढळून आल्यावरून दिनांक ०७/०१/२०१५ च्या आदेशान्वये रूपये ७,६४,६६,७४६/- एवढ्या रकमेच्या दंडाचे आदेश पारित केले.

सदर आदेशाविरूध्द खाणपट्टाधारकाने उपविभागीय अधिकारी काटोल यांच्यासमोर दाखल केलेल्या अपीलामध्ये, उपविभागीय अधिकारी काटोल यांनी दि. २७/०२/२०१५ रोजी आदेश पारीत करून खाणपट्टाधारकाने मध्य रेल्वेकडे जमा केलेल्या स्वामित्वधनाची रक्कम मध्य रेल्वेने तहसिलदार नरखेड यांच्यामार्फत दि. २५/०२/२०१५ रोजी चलनाद्वारे शासनाकडे जमा केली असल्याने, तहसिलदार नरखेड यांचे आदेश रद्द केले.

उपविभागीय अधिकारी, काटोल यांनी पारित केलेले उक्त आदेश खाणपट्ट्याच्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार उचित आहेत किंवा कसे याची शहानिशा करुन गरजेनुसार सदर आदेशाचे पुनरीक्षण करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी नागपूर यांना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मालेगाव शहरातील केबल चालकांनी केबल जोडणींमध्ये केलेला गैरप्रकार**

**(४) * ५२६८७ श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव शहरामध्ये अंदाजे १,२०,००० केबल कनेक्शन असताना केबल चालक शासनाकडे फक्त ११,००० कनेक्शन असल्याचे दाखवून शासनाच्या करोडो रुपायांच्या महसूलाचा अपहार करत असल्याबाबतचे निवेदन, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.महसूल मंत्री यांना दिनांक २५ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने केबल जोडणींमध्ये गैरप्रकार करणाऱ्या केबल चालकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अश्या प्रकारचे निवेदन शासनाकडे दि.२२.०३.२०१६ रोजी प्राप्त झाले आहे.

(२) व (३) सदर प्रकरणामध्ये जिल्हाधिकारी, नाशिक यांचेमार्फत विहीत नियमांनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक जिल्ह्यातील अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळण्याबाबत**

**(५) * ४०९५५ श्री.छगन भुजबळ (येवला), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या गारपीटीमुळे ७१ गावांमधील ३८१७.७९ हेक्टरवरील क्षेत्र बाधित होऊन ७९१५ शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गारपीटीनंतर जिल्हा प्रशासनाने पंचनामा करुन शासनाकडे ५ कोटी १६ लाख ५९ हजार रुपयांच्या मदतीसाठीचा प्रस्ताव पाठविला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रशासनाने राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठवूनही आपतग्रस्त शेतकऱ्यांना अद्याप मदत मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आपतग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) होय.
(३) व (४) माहे एप्रिल ते जून, २०१५ या कालावधीत झालेल्या अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे बाधित झालेल्या शेतक-यांना मदत वाटपासाठी शासन निर्णय दिनांक ११.०३.२०१६ अन्वये, नाशिक जिल्ह्याकरिता रूपये ५१६.८२ लक्ष इतका निधी वितरित करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धारवाडा व दुर्गवाडा (ता.तिवसा, जि.अमरावती) प्रकल्पग्रस्तांची पुनर्वसनाची कामे पूर्ण करण्याबाबत

**(६) * ४९६३० अ‍ॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निम्न वर्धा प्रकल्पअंतर्गत धारवाडा व दुर्गवाडा (ता.तिवसा, जि.अमरावती) येथील प्रकल्पग्रस्तांची पुनर्वसनाची कामे त्वरीत पूर्ण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. पुनर्वसन व मदत कार्य मंत्री यांना दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती दिलेल्या निवेदनानुसार धारवाडा व दुर्गवाडा येथील प्रकल्पग्रस्तांची पुनर्वसनाची कामे त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) सदर निवेदन अप्राप्त आहे. तथापि मा.मुख्यमंत्री महोदयांना दिलेले याचविषयाचे दि.११/१२/२०१५ चे निवेदन विकाक प्रणालीवरून प्राप्त झाले आहे.

(२) व (३) धारवाडा गावाच्या पुनर्वसनाच्या १८ नागरी सुविधापैकी पाणीपुरवठा योजना, शाळा, समाजमंदीर, अंतर्गत रस्ते, वीज पुरवठा, स्मशानभूमी शेडचे काम व बसस्थानकाचे काम पुर्ण झालेले आहे. उघडी गटारांचे काम ५० टक्के पूर्ण झाले असून बाजार ओटे व २ पाण्याचे हौदाचे काम प्रगतीपथावर असून सदर कामे एप्रिल २०१६ अखेर पूर्ण करण्यात येतील. तसेच दुर्गावाडा (आलवाडा) गावाचे पुनर्वसनाकरिता आलेवाडा येथील पुनर्वसित गावाच्या नागरी सुविधाच्या कामापैकी पाणी पुरवठ्याचे काम पुर्ण झाले आहे. इतर नागरी सुविधांची कामे ५० टक्के पूर्ण झाली असून ही कामे जुन-२०१६ पर्यंत पुर्ण करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे खोर व देऊळगाव गाडा (ता.दौंड) परिसरात अवैधरित्या वाळू व मातीचा उपसा होत असल्याबाबत

**(७) * ४१९३० श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाळू व मातीचा अवैध उपसा करणाऱ्या खोर (ता.दौंड) येथील वाळू माफियाला तहसिलदार, दौंड यांनी १ कोटी रुपयांच्या दंडाची नोटीस दिली असल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खोर व देऊळगाव गाडा परिसरातील ओढे, तलाव, बंधारे पडीक जमिनीतून गेली अनेक वर्ष वाळू व मातीचा उपसा अवैधरित्या होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत तसेच अवैधरित्या होणारा उपसा थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) मौजे पिंपळाची वाडी (ता. दौंड) स.नं. १०८ मध्ये मातीमिश्रीत वाळू व मातीचे विनापरवानगी उत्खनन केल्याप्रकरणी तहसिलदार दौंड यांनी संबंधितास दिनांक ०५/१२/२०१५ रोजी रु. १,०३,६६,६००/- इतक्या दंडाच्या रकमेची नोटीस दिली होती. सदर प्रकरणी तहसिलदार दौंड यांनी दिनांक १५/०३/२०१६ रोजी दंडाचे आदेश पारित केले असून, दंडाच्या रकमेच्या वसुलीची कार्यवाही सुरु आहे.

मौजे खोर व देऊळगांव गाडा, ता.दौंड येथील ओढ्यावर छोटे बंधारे, सिमेंट बंधाऱ्याची कामे व ओढा खोल करण्याचे काम पाटबंधारे विभाग व कृषि विभागामार्फत करण्यात आले आहे.

तसेच मौजे खोर येथील तलावातून मातीमिश्रीत वाळूचे अवैध उत्खनन करीत असल्याचे दिनांक २३/११/२०१४ रोजी निदर्शनास आल्यावरुन संबंधितांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मौजे खोर व मौजे पिंपळाची वाडी येथे गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूक प्रकरणी सन २०१४ व २०१५ मध्ये एकूण १० प्रकरणांत रुपये ८,६५,५००/- एवढा दंड वसूल करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चामोर्शी (जि.गडचिरोली) तालुक्यातील गणपूर रेती घाटामधून अवैध रेतीचे उत्खनन होत असल्याबाबत

**(८) * ४९५१२ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चामोर्शी (जि.गडचिरोली) तालुक्यातील गणपूर रेती घाटावर लिलाव होण्याआधीच पोकलॅन्ड मशीनव्दारे हजारो ब्रास रेतीचे उत्खनन करुन, अवैध व बनावट टिपीव्दारे बाहेरील जिल्हयात मोठया प्रमाणात वाहतूक करण्यात आली असल्याची माहिती दिनांक १० फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अवैध उत्खनन करणाऱ्यांवर व दोषी असणाऱ्या संबधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) चामोर्शी तालुक्यातील मौजे गणपूर रै या रेतीघाटामधून अवैध उत्खनन होत असल्याबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने, तपासणी पथक गठीत करुन रेती उत्खननाची मोजणी केली असता, एकूण २३४२ ब्रास रेतीचे उत्खनन केल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार संबंधित लिलावधारकाकडून खुलासा मागविण्यात आला असता, त्यांनी रेतीघाटातील उत्खननाची मोजणी त्यांच्या समक्ष व तांत्रिक यंत्रणेकडून करण्याची मागणी केली. त्यानुसार सदर रेतीघाटामधील उत्खननाची मोजणी, तपासणी पथकाने सूचित केल्याप्रमाणे उपअधिक्षक, भूमीअभिलेख कार्यालय, चामोर्शी यांच्याकडून करण्याची कार्यवाही करण्यात येत असून, पुढील आदेशापावेतो सदर रेतीघाटातील रेतीचे उत्खनन बंद ठेवण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परतवाडा (जि.अमरावती) येथे राज्य परिवहन महामंडळाच्या बसचा झालेला अपघात

**(९) * ५२१२६ श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील परतवाडा येथे राज्य परिवहन महामंडळाची बस पुलावरुन उलटून अपघात झाला असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिवहन महामंडळाच्या जुन्या झालेल्या बसेस वापरात ठेवल्याने त्या परिसरात असे अपघात वारंवार होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या कुटुबांना व गंभीर जखमी झालेल्या प्रवाशांना आर्थिक मदत देण्याच्या दृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) अमरावती जिल्हयातील परतवाडा येथे दि.२४ एप्रिल, २०१५ रोजी परिवहन महामंडळाची बस उलटून अपघात झाला होता.

(२) नाही.

(३) सदर अपघातात एकूण ४८ प्रवाशी जखमी झाले असून १५ प्रवाशांना प्रत्येकी रु. ५००/- व १८ गंभीर जखमी प्रवाशांना प्रत्येकी रु. १०००/- तात्काळ मदत देण्यात आली आहे. तसेच सर्व प्रवाशांना 'पी' फॉर्म देण्यात आले असून 'पी' फॉर्मव्दारे महामंडळाकडे नुकसान भरपाईची मागणी केल्याप्रमाणे २ प्रवाशांना नुकसान भरपाई देण्यात आली आहे. तसेच राज्य परिवहन महामंडळाच्या संबंधित बस चालकाविरुध्द भा.द.वि. २७९, ३३७, ३३८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येवून सदर चालकास निलंबित करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विदर्भ व मराठवाडा विभागातील उद्योग क्षेत्राचा विकास होण्यासाठी आंतरविभागीय समितीने दिलेल्या अहवालाबाबत

**(१०) * ५१५५६ श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ व मराठवाडा विभागातील उद्योगांना इतर विभागातील उद्योगांच्या तुलनेत येणाऱ्या अडचणी, त्या विभागामध्ये उपलब्ध होणारी विज व त्याचा दर तसेच या विभागामध्ये उद्योग क्षेत्राचा विकास जलदगतीने होण्यासाठी प्रलंबित वीज दराचा अन्य भागातील व वर्गवारीच्या वीज दराशी तुलनात्मक अभ्यास करुन शासनास उचित शिफारशी करण्यासाठी विभागीय आयुक्त, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली आंतरविभागीय समिती दिनांक २९ सप्टेंबर, २०१५ रोजी गठीत करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीने विदर्भ व मराठवाडा विभागातील औद्योगिक ग्राहकांच्या अडचणींचा विचार करुन शासनास माहे डिसेंबर, २०१५ च्या चौथ्या आठवड्यात अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अहवाल शासन कधीपर्यंत स्विकारणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधरण कारणे काय ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) आंतरविभागीय समितीने शासनास सादर केलेल्या अहवालातील शिफारशींची छाननी करुन उपयुक्त मुख्य बाबी निश्चित करण्यासाठी मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली सचिव समितीची नियुक्ती करण्यात आली होती. सदर समितीचा अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मराठवाडयातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना खरीप हंगामातील अनुदानाची रक्कम न मिळाल्याबाबत

**(११) * ५२७३६ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना खरीप हंगामातील अनुदानाची रक्कम त्यांच्या खात्यावर दिनांक १५ फेब्रुवारी २०१६ रोजीपर्यंत जमा करण्याबाबत औरंगाबाद विभागीय आयुक्तांनी आदेश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून मराठवाडयातील शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी मंजूर करण्यात आलेल्या २ हजार ६९ कोटी रुपये अनुदानापैकी सुमारे ९१३ कोटी निधी कमी प्राप्त झाल्याने मराठवाडयातील जालना, औरंगाबाद, हिंगोली व नांदेड जिल्हयातील शेतकऱ्यांना खरीप हंगामाच्या अनुदानाची संपूर्ण रक्कम दिनांक १५ फेब्रुवारी २०१६ रोजीपर्यंत प्राप्त झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती सदर अनुदानाची रक्कम उशिराने वितरित करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच खरीप हंगामातील अनुदानाची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर तात्काळ जमा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय. हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त शेतक-यांना खरीप हंगामासाठी मंजूर करण्यात आलेल्या रु.२०६९.०० कोटी अनुदानापैकी आतापर्यंत रु.१६४७.५४ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बागलाण (जि.नाशिक) तालुक्यातील मोसम नदीपात्रात अवैध वाळू उपसा होत असल्याबाबत

**(१२) * ५२४८० श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बागलाण (जि.नाशिक) तालुक्यातील मोसम नदीपात्रात प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अवैध वाळू उपसा मोठ्या प्रमाणात सुरु असल्याने आगामी काळात जलसाठा व भूजल पातळी कमी होऊन सिंचनासाठी तीव्र पाणीटंचाईला सामोरे जाण्याची वेळ मोसम खोऱ्यातील शेतकरी व जनतेवर येणार असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अवैध वाळूचे उत्खनन थांबविण्यासाठी व दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) बागलाण तालुक्यात (जि. नाशिक) गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यासाठी भरारी पथके गठीत करण्यात आली आहेत. सदर पथकांनी केलेल्या तपासणीत वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतुकीची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आली आहेत. त्यानुसार सन २०१५-१६ मध्ये बागलाण तालुक्यात १३३ प्रकरणात रू. ४३,९५,३९२/- एवढी दंडाची रक्कम वसूल करण्यात आली आहे व १३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

वाळू उपशामुळे जलसाठा व भूजल पातळी घटून शेती सिंचनासह तीव्र पाणी टंचाई निर्माण झाल्याची निदर्शनास आले नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बेबंळा प्रकल्प (ता.बाभुळगाव, जि.यवतमाळ) येथील मत्स्यबीज केंद्राच्या इमारतीचे निकृष्ट दर्जाचे झालेले बांधकाम**

**(१३) * ४७४१७ प्रा.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बेबंळा प्रकल्प (ता.बाभुळगाव, जि.यवतमाळ) येथे सार्वजनिक बाधकाम विभागाव्दारे बांधण्यात आलेल्या मत्स्यबीज केंद्राच्या इमारतीचे व इतर बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे बांधकामाला तडे पडल्याचे दिनांक २० ऑक्टोंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने निकृष्ट दर्जाच्या कामाची गुणनियंत्रण विभागा मार्फत तपासणी करुन निकृष्ट दर्जाच्या इमारतीचे बांधकाम करणाऱ्या अधिकाऱ्यांवर व ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे, अंशत: खरे आहे.
(२) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आलेली नाही, तथापि प्रादेशिक आयुक्त मत्स्य यांच्या दि. ५/३/२०१६ च्या भेटी दरम्यान मत्स्यबीज केंद्रासाठी बांधण्यात आलेल्या हॅचरी युनीटमधील उबवणी टाकीला काही प्रमाणात बारीक तडे गेल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर बाब जिल्हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता यांच्या निदर्शनास आणलेली असून, त्यांनी कोणत्याही प्रकारची कामे अपूर्ण न ठेवता परिपूर्ण बांधकाम करुनच मत्स्यबीज केंद्राची इमारत इतर बांधकामासह ताब्यात देण्याची हमी दिलेली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील उच्चदाब यंत्रमागधारकांच्या वीज दरातील सवलतीबाबत

**(१४) * ४८७७२ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उच्चदाब यंत्रमागधारकांना सुरु असलेली वीज दरातील सवलत कायम ठेवण्याची मागणी फेडरेशन ऑफ ऑल इंडिया टेक्सटाईल मॅन्युफॅक्चर्स असोशिएशनच्या शिष्टमंडळाने मा.वस्त्रोद्योग मंत्री, राज्यमंत्री व वस्त्रोद्योग विभागाचे अपर मुख्य सचिव इत्यादींच्या उपस्थितीत, मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक २ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केलेली असून याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन मा.मुख्यमंत्री यांनी दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शिष्टमंडळाने निवेदनाद्वारे सादर केलेल्या मागण्यांचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(४) असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) उच्चदाब यंत्रमाग ग्राहकांची वीजदरातील बंद केलेली सवलत पूर्ववत सुरु करण्याबाबत निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे.

(३) व (४) सदर बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईसह राज्यभरातील समुद्रात अनधिकृतरित्या होणारी मासेमारी बंद करण्याबाबत

**(१५) * ५१६६६ श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यभरातील समुद्रात अनधिकृतरित्या सुरु असलेली मासेमारी तात्काळ बंद न झाल्यास समुद्रात संघर्ष करण्याचा इशारा अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीने माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने पर्ससीन नेटवर बंदीचा आदेश दिनांक ५ फेब्रुवारी, २०१६ रोजी काढला असून या आदेशात सप्टेंबर ते डिसेंबर या कालावधीतच मासेमारी करता येईल असे निर्बंध असताना देखील राज्याच्या ठिकठिकाणच्या समुद्रात २ हजार पर्ससीन नेट टॉलर्सच्या नौका बेकायदेशीर मासेमारी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या आदेशाचे उल्लघन करणाऱ्या भांडवलदारांच्या नौका व पर्ससीन जाळी जप्त करुन त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने किती भांडवलदारांच्या नौका व पर्ससीन जाळी जप्त करुन त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) व (३) हे खरे नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयात वाहन योग्यता प्रमाणपत्रे देताना झालेली अनियमितता

**(१६) * ४८१८६ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयातील (आरटीओ) निरीक्षकांकडून कोणत्याही वाहनांची तपासणी करण्यात येत नसल्याने, अशा परिस्थितीत तपासणीविनाच त्यांना योग्यता प्रमाणपत्रे दिली जात असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहरात वाहनांची तपासणी न करताच योग्यता प्रमाणपत्र (फिटनेस सर्टिफिकेट) देणाऱ्या ३० निरीक्षकांवर कारवाई करण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने आदेश देऊनही आठ महिने झाले तरी अजून त्यांच्याविरुध्द कारवाई होत नसल्याचे, माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती पुणे शहरात वाहनांची तपासणी न करताच योग्यता प्रमाणपत्र (फिटनेस सर्टिफिकेट) देणाऱ्या ३० निरीक्षकांवर कारवाई करण्याबाबत, तसेच वाहनांची तपासणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) ते (४) श्री. श्रीकांत कर्वे यांनी मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या क्रिमिनल रिट याचिका क्र. २७९९/२०१४ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि ०९/०६/२०१५ रोजी श्री.कर्वे यांनी वाहन योग्यता प्रमाणपत्र देताना अनियमितता केलेल्या अधिकाऱ्यांविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याची परवानगी मागितलेल्या दि. ११/०५/२०१४ च्या अर्जावर आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून प्राधान्याने ३ महिन्यांच्या आत निर्णय घ्यावा असे आदेश दिलेले आहेत, त्यास अनुसरुन श्री.कर्वे यांच्या अर्जात नमूद अधिकाऱ्यांचे खुलासे तसेच प्रकरणनिहाय सर्व कागदपत्रे तपासली असता एकूण २६ अधिकाऱ्यांपैकी १० अधिकाऱ्यांविरुध्द गुन्हा दाखल करण्यास परवानगी देता येत नाही असे आढळून

आल्याने सदर १० अधिकाऱ्यांविरुध्द गुन्हा दाखल करण्यास परवानगी न देण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. उर्वरित १६ अधिकाऱ्यांच्या प्रकरणी काही कागदपत्रांची मागणी करण्यात आली असून ते प्राप्त झाल्यानंतर तपासणीअंती उचित निर्णय घेण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्हयातील अल्पसंख्यांक मुलां-मुलींसाठी बांधण्यात येणाऱ्या वसतिगृहाबाबत

**(१७) * ४५७४९ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्हयातील अल्पसंख्यांक मुलां-मुलींसाठी वसतिगृह बांधण्यात येणार असून त्यासाठी नगर शहराजवळ वडगाव गुप्ता या ग्रामपंचायतीच्या हद्दीतील दोन एकर जमीन निश्चीत करण्यात आल्याचे, माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती संबंधित वसतिगृह उभारण्याचा प्रस्ताव मंजूर करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तिवसा (जि.अमरावती) येथील पूरग्रस्तांच्या पुनर्वसनाकरिता निधी मंजूर करण्याबाबत

**(१८) * ५०३७७ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवसा (जि.अमरावती) येथे सन २००७ मध्ये मुसळधार पावसामुळे आलेल्या महापुरात सापडलेल्या पूरग्रस्तांचे पुनर्वसन करण्याकरिता सन २०१४-१५ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री यांनी मंजूर केलेल्या रु. १० कोटी निधीपैकी फक्त रु. ३ कोटी एवढा अल्प निधी वितरीत केल्यामुळे पूरग्रस्तांचे पुनर्वसन झाले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्ह्यातील वलगाव येथील ५०० च्यावर पूरग्रस्तांचे पुनर्वसन करण्याकरीता घरांसाठी जमीन खरेदी, घर बांधणी व इतर मुलभूत सुविधांसाठी किमान १५ कोटीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पूरग्रस्तांचे पुनर्वसनाकरिता रु. ४० कोटी निधी मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १३ ऑगस्ट, २०१५ रोजी मा.सचिव, मदत व पुनर्वसन विभाग, मुंबई यांना निवेदन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही.

(२) अंशत: खरे आहे.

(३) होय.

(४) होय.

(५) पुरवणी मागणीद्वारे मंजूर रु. १०.६६ कोटी इतका निधी वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## देवाडा खुर्द, रामपूर दीक्षित व कोसंबी रिठ (ता.पोंभुर्णा, जि.चंद्रपूर) येथे जमिनीचे पट्टे वाटपात झालेली अनियमितता

**(१९) * ५०४१८ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवाडा खुर्द, रामपूर दीक्षित, कोसंबी रिठ (ता.पोंभुर्णा, जि.चंद्रपूर) येथील शेतशिवाराच्या शासकीय जागेवर वडिलोपार्जित वहिवाट व ताबा नसतांना महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्या संगनमताने बनावट कागदपत्र बनवून त्या कागदपत्रांच्या आधारे अनेकांना जमिनीचे पट्टे महसूल विभागाकडून वाटप करण्यात आले असल्याचे, दिनांक १२ फेब्रुवारी २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने बनावट कागदपत्र बनवून त्या कागदपत्रांच्या आधारे अनेकांना जमिनीचे पट्टे देणाऱ्या महसूल विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) मौजा देवाडा खुर्द, रामपूर दीक्षित, कोसंबी रिठ ता.पोंभुर्णा, जि.चंद्रपूर येथील बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय जमिनीचे पट्टे वाटप करण्यात आल्याबाबत स्थानिक नागरीकांचे निवेदन जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना प्राप्त झाले आहे. त्याबाबत उपविभागीय अधिकारी, गोंडपिंपरी यांच्या चौकशी अहवालावरुन पाच प्रकरणांमध्ये अनियमितता झाल्याचे सकृतदर्शनी निर्देशनास आले आहे. त्यानुषंगाने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम २५८ अन्वये प्राप्त अधिकारानुसार तीन प्रकरणांमध्ये जमिनीचे पट्टे मंजूर करण्याच्या आदेशाचे पुनर्विलोकन करुन पट्टे रद्द करण्याबाबतचे निर्देश उपविभागीय अधिकारी, गोंडपिंपरी यांना जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी दिले आहेत.

तसेच अन्य दोन प्रकरणांबाबत सखोल चौकशीचे निर्देशही उपविभागीय अधिकारी, गोंडपिंपरी यांना जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी दिले आहेत.

----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.